लोकमत

# जलविज्ञान तंत्रात संशोधनाची मोठी संधी

## व्यंकटेश मेरवाडे : शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागातर्फे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जलविज्ञानाचे तंत्र उन्नत करण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी याकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. आपत्ती टाळण्यासाठी पूरग्रस्त भागाचे नकाशे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार करणे अत्यंत निकडीचे आहे, असे प्रतिपादन अमेरिकेच्या पर्ड्यू विद्यापीठातील प्रा. व्यंकटेश मेरवाडे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात प्रा. व्यंकटेश मेरवाडे यांनी मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त 'भौगोलिक माहिती प्रणालीच्या साहाय्याने आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. डेहराडून येथील 'इस्रो'चे शास्त्रज्ञ भास्कर निकम, चेन्नई विद्यापीठाचे डॉ. सुलोचना शेखर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, नैसर्गिक आपत्ती टाळण्यासाठी पुढच्या अनेक वर्षांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक आहे. सुरुवातीला कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते अधिविभागातील विद्यार्थ्यांना संशोधनामध्ये कौशल्य प्राप्त होण्यासाठी तीस टॅबचे वितरण करण्यात आले.

भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. टी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी श्री. मुस्तफा, डॉ. सी. टी. पवार, डॉ. एस. बी. देशमुख, डॉ. रमोत्रा, उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, डॉ. पी. के. दत्ता यांच्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा येथील संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. विद्या अजित चौगुले यांनी आभार, डॉ. एम. बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Kolhapur
Page No. 8 Aug 07, 2018
Powered by: erelego.com

पुढारी

# विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांना ‘विमा कवच’

## विद्यापीठ सुरक्षा निधी योजना; संलग्न महाविद्यालयांसह आई-वडील लाभासाठी पात्र

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा निधी योजना सुरू केली आहे. या विमा कवचाच्या माध्यमातून यावर्षी ५० जणांना सुमारे ३३ लाख रुपये देण्यात आले आहेत.



शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांत अनुदानित व विनाअनुदानित असे २८३ हून अधिक महाविद्यालये आहेत. यात सुमारे अडीच लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. महाविद्यालयात जाताना होणारे छोटे-मोठे अपघातामुळे विद्यार्थ्यांना दुखापत होते. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. याशिवाय उपचार करण्याची काही पालकांची आर्थिक परिस्थिती नसल्याने अचडणीचे ठरते. अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी सुरक्षा निधी योजना सुरू केली आहे.

योजनेत विद्यापीठ किंवा संलग्नित महाविद्यालये तसेच दूरशिक्षण केंद्रांतर्गत, पदव्युत्तर विभागात प्रवेशित विद्यार्थी, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात, संशोधन संस्थेत, पदव्युत्तर अधिविभागामध्ये अर्धवेळ, पूर्णवेळ किंवा तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षक आणि शिवाजी विद्यापीठ कार्यालयातील आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी लाभासाठी पात्र आहेत.

वाहन अपघात मृत्यू, नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू (पूर, भूकंप), कायमचे, अर्ध अपंगत्व, काही अवयव निकामी व नैसर्गिक मृत्यू झाल्यास ५० हजार ते १ लाख रुपये देण्यात येतात. यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना नाममात्र शुल्क ठेवण्यात आले आहे. २०१४-१५ रोजी सुमारे ३० लाभार्थींना सुरक्षा निधी योजनेचा लाभ झाला आहे.

> विद्यापीठाने सुरु केलेली सुरक्षा निधी योजना चांगली आहे; परंतु पालकांच्या मृत्यूनंतर विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अडचणीचे ठरते. याचा विचार करून कमिटी स्थापन करण्यात आली आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
>
> **– डॉ. आर. व्ही. गुरव,**
> माजी संचालक, विद्यार्थी विकास

### आई–वडील लाभास पात्र

*सुरक्षा निधी योजनेत विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांचे आई व वडील योजनेच्या लाभास पात्र आहेत. आई व वडिलांकरिता अपघाती मृत्यू, नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू, पूर्ण अपंगत्व ,नैसर्गिक मृत्यू आल्यास २५ हजार रुपये देण्याची तरतूद करण्यात आली आहे.*